डॉ. प्रभाकर देसाई
एम्.ए., पीएच्.डी.
संचालक

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

## राष्ट्रीय सेवा योजना

गणेशखिंड, पुणे – ४११ ००७

कार्यालय क्र. : ०२०–२५६९७३४१
०२०–२५६०११५३
फॅक्स क्र. : ०२०–२५६९७३४१
मोबाईल : ९८८१९०८०२०

संदर्भ : रासेयो/३४५/२०१८ दि. ०८/१२/२०१८

प्रति,

मा. प्राचार्य,

रासेयो संलग्नित महाविद्यालये,

संबधीत कार्यक्रम अधिकारी,

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ.

विषय : "लोकशाही पंधरवडा साजरा करण्याबाबत"....

महोदय,

राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र यांनी पाठवलेल्या पत्रानुसार भारतीय संविधानातील ७३ व ७४ व्या घटनादुरूस्तीस २५ वर्ष पूर्ण झाल्या बद्दल नोंव्हेबर २०१७ पासुन 'लोकशाही, निवडणूक व सुशासन' या विषयावर राष्ट्रीय परिषद झाली तसेच २०१८ मध्ये आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन केले होते. या परिषदांमध्ये मतदार जागृती संदर्भात लोकशाहीचे शिक्षण मतदारांना देण्याची आवश्यक्ता आहे. या अनुषंगाने लोकशाही पंधरवडा साजरा करण्यासंदर्भात विभागीय आयुक्त व काही जिल्हाधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या अहवालावरून दि. २६ जानेवारी २०१९ ते १० फेब्रुवारी २०१९ या कालावधीत विभाग, जिल्हा व तालुका पातळीवर लोकशाही पंधरवडा साजरा करण्यात यावा. 'जागरूक मतदार, लोकशाहीचा आधार!' या विषयावरती आधारित खालीलप्रमाणे लोकजागृती करावी.

अ) स्थानिक पातळीवर लोकशाही पंधरवडा साजरा करताना आयोगाने दि. ६ जानेवारी २०१८ रोजी निर्गमित केलेल्या स्थायी आदेशातील निर्देशांचे पालन करावे.

ब) तसेच जिल्हा कार्यालयांकडून प्राप्त झालेल्या अहवालातील खालील नावीन्यपूर्ण कल्पना राबविण्यात याव्यात–

१) महाविद्यालयांमध्ये दरवर्षी जिल्हाधिकारी व संचालक, रासेयो यांच्या स्वाक्षरीचे प्रमाणपत्र देऊन पुरस्कृत करणे.

२) १८ व १९ वर्षे वयोगटातील विद्यार्थ्यांची निश्चिती करून त्यांचे नाव मतदार यादीत अंतर्भूत करण्यासंदर्भात जिल्हा निवडणूक कार्यालयाशी महाविद्यालयांनी समन्वय साधणे.

३) महाविद्यालयीन विद्यार्थ्यांकडून शाळेच्या कंपाऊड वॉलसह मुख्य मार्गिका, शहरातील दळणवळणाच्या प्रमुख ठिकाणी उदा. रेल्वे, पादचारी पूल इ. ठिकाणी मतदार जागृतीबाबत आकर्षक सचित्र संदेश रंगविणे.

४) सहकारी गृहनिर्माण संस्थांच्या जनरल बॉडी सभेमध्ये निवडून येणाऱ्या रहिवाशांनी मतदार नोंदणी/ लगतच्या निवडणुकीत मतदान केले आहे का याबाबत विचारणा करणारा मुद्दा नामनिर्देशन पत्रात अंतर्भूत करणे.

५) २६ जानेवारीसह सर्व प्रमुख दिवशी लोकप्रतिनिधी, प्रमुख वक्त्यांच्या भाषणामध्ये लोकशाही, निवडणूका व सुशासन' या विषयावर कमीत कमी ३ ते ४ वाक्ये अंतर्भूत करणे.

भारतीय संविधानातील ७३ व ७४ व्या घटनादुरूस्तीचे रौप्य महोत्सवी वर्ष आहे तर राष्ट्रपिता महात्मा गांधीचे १५०वे जयंती वर्ष असून या वर्षामध्ये व त्यापुढे होणाऱ्या सर्व निवडणुकांमध्ये सर्व मतदारांनी राष्ट्रीय कर्तव्य भावनेतून सहभाग घेणे आवश्यक आहे. महाराष्ट्र शासनाने सूचित केल्यानुसार वरील कार्यक्रमांचे व उपक्रमांचे आयोजन आपल्यामार्फत अतिशय नियोजनबद्धरितीने व्हावे, असे आवाहन करीत आहोत. तसेच शासन निर्देशाप्रमाणे आपण केलेल्या कार्यवाहीचा छायाचित्रासह अहवाल राष्ट्रीय सेवा योजना, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे यांना सादर करावा. उपक्रम आयोजनाचा खर्च नियमीत कार्यक्रमातून करावा. कळावे, ही विनंती.

संचालक
राष्ट्रीय सेवा योजना